Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 340-342
DOI: 10.5281/zenodo.10125888

Original Research Article

# महात्मा गांधी यांचे श्रमविषयक विचार

प्रा. डॉ. निवृत्ती उत्तमराव नाईक

विभागप्रमुख, इतिहास विभागप्रमुख, ग्रामीण (ACS) महाविद्यालय, वसंतनगर, (कोटग्याळ) ता. मुखेड जि. नांदेड ४३१७४२ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: nivrutinaik30@gmail.com

Received: 13 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 27 October, 2023

## प्रस्तावना

महात्मा गांधीजींनी भारतातील समाजसुधारक, विचारवंत यांच्या परंपरेतील अग्रगण्य नाव आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी विसाव्या शतकातील महत्त्वपूर्ण महापुरुष होते. ‘येणाऱ्या पिढ्या विश्वास करू शकणार नाहीत की हाडामांसाचा एक मनुष्य पृथ्वीतलावर होऊन गेला’ असे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वर्णन महान शास्त्रज्ञ अल्बर्ट आईनस्टाईन यांनी आहे. गांधीजींनी सत्य, अहिंसा, सत्याग्रहाची अनमोल देणगी भारताला दिली. एवढेच नव्हे तर या मूल्यांआधारे त्यांनी भारताला स्वातंत्र्यही मिळवून दिले. जगात व्हाव्या वाटणाऱ्या प्रत्येक सुधारणेची सुरुवात स्वत:पासून करण्यावर त्यांचा विश्वास होता. श्रमातूनच मानवी गरजांची पुर्तता होत असते त्यामुळे मानवी जीवनात श्रमाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी कायकवै कैलास असा मूलमंत्र दिला होता. त्याचा महात्मा गांधीनी आपल्या जीवनामध्ये उपयोग केलेला दिसून येतो. श्रम हे मूल्य त्यांनी स्वत: तर आयुष्यभर जपलेच शिवाय या मूल्यांची रुजवणूक भारतीय जनमानसात केली. गांधीजींनी श्रमप्रतिष्ठेला खूपच महत्त्व दिल्याचे दिसून येते. आपल्या दैनंदिन उदरनिर्वाहासाठी जेवढे आवश्यक आहेत तेवढे कष्ट, श्रम प्रत्येकाने केलेच पाहिजेत असे त्यांचे मत होते. ते नियत्यनिमाने चरखा चालवत असत. स्वच्छतेलाही त्यांच्या जीवनात अनन्यसाधारण महत्त्व होते. प्रत्येक व्यक्तीने आपला उदरनिर्वाह करण्यासाठी अनिवार्य असलेले भोजन स्वकष्टातून अर्जित करावे असे त्यांचे मत होते. श्रमामुळे व्यक्तिगत लाभाबरोबर शरीरस्वास्थ्यही लाभते. त्यामुळे म.गांधीजींचा श्रमाविषयीचा दृष्टिकोन व्यापक होता.

**उद्दिष्ट**

महात्मा गांधीजींच्या श्रमविषयक विचारांचा अभ्यास करणे प्रस्तुत शोधनिबंधाचे मुख्य उद्दिष्ट्य आहे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या लेखनासाठी संशोधन पद्धतीतील साधनांपैकी द्वितीय तथ्य संकलन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे. यात संदर्भ ग्रंथ, शोधनिबंध, मासिके, लेख व इतर संबंधीत साहित्याचा उपयोग करण्यात आला आहे.

**विषय विश्लेषण**

महात्मा गांधीजींच्या मते, शारिरिक श्रमातून फक्त उत्पादनच मिळत नाही तर आनंदही मिळतो. हेतूपूर्वक श्रम केल्यास उत्पादकता आणि आनंदही वाढतो असे त्यांनी म्हटले आहे. श्रमाविना जगणे, धनिकाने संपत्तीचा साठा करणे याला महात्मा गांधीजींचा विरोध होता. श्रमाचा खरा अर्थ मेहनत असून त्यातूनच माणसाचा उदरनिर्वाह चालावा. माणसाचे भरणपोषण श्रमातून झाल्यास त्याच्यात दानशूर वृत्ती वाढते असे त्यांचे मत होते. ज्या समाजाचा आधार श्रम असत नाही तिथे विषमतेची भावना वाढते. तिथे श्रमजीवी व श्रमशोषक असे दोन वर्ग निर्माण होतात. त्यामुळे श्रमजीवी व श्रम शोषक वर्गात संघर्ष अनिवार्य असतो. ज्याचा परिणाम समाजात अशांतता व अराजकता उत्पन्न होते. गांधीजींच्या मते, भांडवलदार कितीही शोषण करीत असला तरी श्रमाचे मोल अधिक आहे. श्रमिकाने आपल्या श्रमाची ताकद ओळखली तर श्रमाविना भांडवल काहीच कामाचे नाही. म.गांधीजींच्या सर्वोदय संकल्पनेमध्ये शरीरश्रमांना प्रतिष्ठा होती. पैशापेक्षा श्रमाला महत्त्व होते. पैशावर प्रतिष्ठा ठरु लागल्याने धनसंचयाची दुष्ट प्रवृत्ती वाढीस लागते. मुठभर अनुत्पादक वर्गाच्या हाती जमीन आणि उत्पादनाची साधने एकवटल्याने श्रमाचे मूल्य नष्ट होते. म्हणूनच जोपर्यंत समाजात श्रमप्रतिष्ठा स्थापन होत नाही, तोपर्यंत गरीब-श्रीमंतातील दरी आणि विषमता नष्ट होणार नाही.

श्रमिक व्यक्ती राष्ट्राच्या दृष्टीने किती महत्त्वाचे आहेत याची जाणीव त्यांच्या विचारांतून भारतीयांना तत्त्कालिन परिस्थितीत झाली. श्रमिक व्यक्ती हे समाज व राष्ट्राच्या अनुषंगाने तर महत्त्वाचे आहेच. मात्र आजच्या स्थितीत श्रमिकांना म्हणजे जे शारिरीक श्रम करतात त्यांना प्रतिष्ठा मिळत नाही. त्यांचे जीवन अत्यंत समस्याग्रस्त बनले आहे. हे मानवीय दृष्टिने योग्य नाही. महात्मा गांधी आर्थिक विकासासाठी मानवी श्रमाला अधिक महत्त्व देतात. श्रमप्रधान उद्योगाला त्यांनी प्रोत्साहन दिलेले दिसून येते. श्रीमंत आणि गरीब यांच्यातील संघर्ष नाहीसा करुन देशात सर्व क्षेत्रातील विषमता नष्ट करुन समता प्रस्थापित करावयाची असेल तर महात्मा गांधीजींच्या या विचाराची अमलंबजावणी करणे काळाची गरज आहे.

महात्मा गांधी ही व्यक्ती नसून तो एक विचार झाला आहे. खऱ्या अर्थाने म.गांधीजींच्या स्वप्नातील भारत घडवायचा असेल तर श्रमप्रतिष्ठा मोठ्या प्रमाणात निर्माण व्हावी लागेल. गांधीजींच्या या विचारांपासून प्रेरणा घेऊनच

विनोबांनी हा कांचनमुक्ती प्रयोग हाती घेतला. त्यामुळे महात्मा गांधींच्या विचारांतून प्रेरणा घेऊन जीवनात त्याचा वापर केल्यास व्यक्तीच्या जीवनात सुख-समृद्धी येऊ शकते यात शंका नाही. श्रमविषयक विचारांची मांडणी त्यांनी आपल्या लेखनातूनही केलेली दिसून येते. भारत सरकारतर्फे गांधी जयंतीनिमित्त श्रमदान करण्याचे आवाहन करण्यात आले होते. भारत सरकारने महात्मा गांधींच्या विचारांतून प्रेरणा घेऊन स्वच्छ भारत अभियान, महात्मा गांधी रोजगार हमी योजना अशा उपक्रमांच्या माध्यमातून श्रमविषयक विचार रुजवण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

**निष्कर्ष**

१. श्रमाला गांधींनी आपल्या जीवनात अत्यंत महत्त्वाचे स्थान दिले.
२. श्रमाचे महत्त्व विशद करून गांधीजींनी व्यक्तीला स्वावलंबी बनविण्याचा मार्ग दाखविला आहे.
३. महात्मा गांधींनी श्रम या मूल्याची रुजवणूक भारतीय समाजात केल्याचे दिसून येते.
४. म.गांधीच्या श्रमप्रतिष्ठा विषयक विचाराला अनुसरून आवश्यक ते धोरणे व कायदे शासनाने निर्माण करून अमलात आणणे गरजेचे आहे.

**संदर्भ**

१. डॉ. भा. ल. भोळे, आधुनिक भारतातील राजकीय विचार, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर
२. महात्मा गांधी, माझ्या स्वप्नातील भारत, साकेत प्रकाशन, औरंगाबाद
३. साधना साप्ताहिक
४. मासिके/वर्तमानपत्रे
५. https://royalbulletin.in